
## पत्नीच्या हत्याप्रकरणी

# अटक असलेल्या आरोपीला कोरोनाची लागण उपचारदरम्यान कोरोनाग्रस्त आरोपीने केला पोबारा



कल्याण, दि. २२(प्रतिनिधी) :- पत्नीच्या हत्या प्रकरणी अटकेत असणाऱ्या आरोपीला कोरोनाची लागण झाल्याने उपचारासाठी टाटा आमंत्रण बिल्डिंग राजनोली नाका येथे ठेवण्यात आले असता . रविवारी दुपारी या आरोपीने तेथुन पोबारा केल्याची खळबळजनक घडल्याने फरार आरोपी कोरोना बाधित असल्याने त्यांच्या पासुन निर्माण होणाऱ्या संसर्गाचा धोका असल्याने पोलीस यंत्रणेला त्यांचा शोध घेऊन पकडण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

मे २०20 महिन्याच्या अखेरीस मोहने येथील जेतवन नगर आदिवासी पाड्यात राहणाऱ्या बाळू खरात याने पत्नीला गळफास देऊन हत्या केल्याप्रकरणी खडकपाडा पोलिसांनी तातडीने तपास करीत भा.द.वि. मध्ये अटक केली होती. अटकेत असलेल्या आरोपी बाळु दशरथ खरात वय वर्षे रा.कल्याण यांचा कोविड -१९ कोरोना रिपोर्ट पाँझाँटिव्ह आल्याने उपचाराकरिता १६जुन रोजी पासुन टाटा आमंत्रण बिल्डिंग राजणोली नाका येथे ठेवण्यात आले होते. आरोपी कोरोना रूग्ण बाळुवर तेथे उपचार सुरू असताना रविवारी दि. २१ रोजी दुपारी २.00 वा.चे सुमारास गर्दीचा फायदा घेत आरोपी कोरोना रुग्ण बाळुने पोबारा केला. याप्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात गु.नं १६६/2020 भा.द.वि क. २२४,१८८,२६९,२७१ सह महाराष्ट्र कोव्हिड - १९ उपाययोजना नियम सह साथीचे रोग प्रतिबंध अधिनियम १८९७चे कलम २,३, ४ सह अप्पती व्यवस्थापन अधिनियम २००५चे क. ५१(ब) प्रमाणे दाखल झाला आहे. फरार आरोपी कोरोना रुग्णांच्या शोधात पोलिस आहेत. पोलिसांनी या आरोपी बाबत जो माहिती देईल त्याचे नाव गुपित ठेवून त्याला योग्य ते बक्षीस दिले जाणार असल्याचे घोषित केले आहे. तरी आरोपी कोरोनाग्रस्त बाळु खरात आढळून आल्यास पोलीसांना कळवावे असे आवाहान पोलिसांनी केले आहे.

# अंबरनाथ बनत आहे कोरोना हॉटस्पॉट

अंबरनाथ दि २२ - अंबरनाथ शहरात कोरोना रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना शनिवारी तब्बल १३१ कोरोना बाधित नवे रूग्ण आढळुन आल्याने शहरात चिंतेचे वातावरण झाले आहे, सर्व पक्षिय, सामाजिक संस्था, संघटना व नागरिकांकडुन अंबरनाथ शहरात पुन्हा अनलॉकच्या जागी कडकडीत लॉकडाउन करण्याची मागणी होऊ लागली आहे. अंबरनाथ शहरात शनिवारी सर्वाधिक १३१ रूग्ण आढळुन आल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. जून महिन्यात कोरोना रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. दरम्यान बंद पडलेल्या डेंटल कॉलेजमध्ये ५00 बेडस व पुर्व भागातील युपीएसी भवनमध्ये १00 बेडसचे कोव्हिड कोरोना केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. निगेटिव्ह-पोझेटिव्ह खेळात शहरात विनाकारण वाढता मुक्तसंचार पाहता सोमवारी ते शनिवार दरम्यान ४४0 कोरोना बाधित रुग्णांची भर पडली आहे. प्रशासकीय यंत्रणेच्या अपयशावर नागरिकांनी कहर केला आहे.

अंबरनाथ शहरात आतापर्यंत एकुण ११२0 कोरोना बाधित झालेत. ४१0 रूग्णांवर उपचार सुरू असून १९३ जणांना होम क्वारंटाईन करण्यात आले आहे. ४९३ जण बरे होउन घरी परतले आहेत. आतापर्यंत २६५२ जणांचे स्वॅब सॅम्पल घेण्यात आले असुन २५६ जणांचा रिपोर्ट प्रतिक्षेत आहे. शनिवारी पुर्व कानसई भागातील ४७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यु झाला असून आतापर्यंत २४ जण मृत पावले

अंबरनाथ ( प ) येथील बांद्रापाडा,चिंचपाडा, हौसिंग बोर्ड कॉलनी ,बुवावाडा अंबरनाथ ( पूर्व ) येथील बी केबीन रोड, या संपुर्ण क्षेत्रात रुग्णांचा आकडा मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्या ठिकाणी लॉकडाऊन अधिक प्रभावीपणे राबविणे, जास्तीत जास्त रुग्ण तपासणी करणे, सदर भाग दिवसातून किमान २ वेळा फवारणी करणे, शौचालय स्वच्छ करणे, संनिटाइस करणे वगैरे.,सीसीटीव्ही लावणे व ड्रोन कॅमे-याचाही वापर करणे या बाबींची अंमलबजावणी करण्यात येईल असे उपविभागीय अधिकारी जगतसिंग गिरासे यांनी सांगितले .

# 'कोरोना'वर मोफत उपचार घोषणेतून राज्य सरकारची 'बनवाबनवी'

## गंभीर रुग्णांवरच उपचार, सौम्य व मध्यम रुग्ण वाऱ्यावर : नारायण पवार



ठाणे, दि. २२ (प्रतिनिधी) : राज्य सरकारने सर्व कोरोना रुग्णांवर मोफत उपचार करण्याची केलेली घोषणा ही निव्वळ बनवाबनवी असून, नागरिकांची फसवणूक आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून ठाण्यातील रुग्णालयात गंभीर स्थितीतील रुग्णांवरच मोफत उपचार केले जातात. तर सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णांना हॉस्पीटलच्या खर्चाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, असा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांनी पत्राद्धारे केला आहे.

राज्य सरकारने २३ मे रोजी अध्यादेश काढून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व अंगीकृत रुग्णालयांमार्फत सर्व कोरोनाबाधित रुग्णांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यात पिवळी, केशरी, शुभ्र शिधापत्रिकाधारकांना समाविष्ट करण्यात आले होते. या योजनेनुसार राज्यातील सर्व नागरिकांचा योजनेत समावेश झाला होता.


राज्य सरकारच्या निर्णयानुसार, कोरोना बाधीत रुग्णांवर मोफत उपचार व्हायला हवेत. मात्र, महात्मा फुले जन आरोग्य योजनेत सहभागी झालेल्या हॉस्पीटलमध्ये केवळ गंभीर स्थितीतील रुग्णांवर उपचार केले जातात. तर सौम्य रुग्णांवर उपचाराची तरतूद नसल्याचे हॉस्पीटलकडून सांगण्यात येते. अशा रुग्णांना किमान ५0 ते ७0 हजारांचे डिपॉझिट देऊन हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागत आहे. त्याचबरोबर औषधे, इंजेक्शनसाठी हजारो रुपयांचा भरणा करावा लागतो. काही हॉस्पीटलमध्ये तर आरोग्य योजनेचे प्रकरण मंजूर होईपर्यंत सर्वच रुग्णांकडून ५0 हजारांची डिपॉझिट घेतली जाते. त्यामुळे कोरोना रुग्णांवर मोफत उपचाराची राज्य सरकारची घोषणा म्हणजे केवळ बनवाबनवी असून, सामान्य नागरिकांची फसवणूक केली जात आहे, असा आरोप ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांनी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना ई-मेलद्धारे पाठविलेल्या पत्रात केला आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत सहभागी झालेल्या ठाण्यातील सर्व हॉस्पीटलमध्ये आपण चौकशी केली. त्यावेळी गंभीर स्थितीतील रुग्णावर मोफत उपचार होतील. सौम्य वा मध्यम लक्षणे असलेल्या रुग्णांना उपचारासाठी पैसे आकारले जात आहेत. रुग्णाची स्थिती पाहून आपण निर्णय घेऊ, असे हॉस्पीटलच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. मात्र, याबाबत कोणत्याही हॉस्पीटलच्या व्यवस्थापनाकडून लेखी माहिती देण्यात आली नाही, याकडे नगरसेवक नारायण पवार यांनी लक्ष वेधले आहे.

# अटाळी, वडवली, आंबिवलीत पाणी बाणीचे ग्रहण

कल्याण, दि. २२ :- शनिवारी अटाळी सबपंप हाऊसच्या ट्रांसफार्मर चा बिघाड झाल्यामुळे पाणी पुरवठा ठप्प झाल्याने आंबिवली, अटाळी, वडवली परिसरात पाणी बाणी परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्यासाठी लोकांना वणवण करावी लागली. कोरोना च्या संकटात पाण्यासाठी नागरिकांना टँकर पाठी धावावे लागले.



अटाळी सबपंप हाऊसच्या शनिवारी बिघाड झालेल्या ट्रांसफार्मर बदलण्याचे काम रविवारी रात्री उशिरापर्यंत सुरु होते. त्यामुळे अटाळी, आंबिवली, वडवली भागात पाणी चालू होण्यासाठी सोमवारीची सकाळ होईल. तरीही सर्व नागरिकांनी पिण्याचे पाणी जपून वापरावे. असे पाणीपुरवठा उप अभियंता उदय सुर्यवंशी यांनी सांगितले, तसेच टाँकरने पाणी पुरवठा सुरु असल्याचे सांगितले

## अशोक चव्हाणांची मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्ष पदावरून हकालपट्टी करा, मराठा क्रांती ठोक मोर्चाची मागणी

मुंबई, दि. २२ : सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या निकालाची सुनावणी ७ जुलैला होणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने आपली बाजू कोर्टात मांडण्यासाठी काय तयारी केली? याची माहिती मराठा समाजाला मिळणे आवश्यक आहे. यासाठी मराठा आरक्षण उपसमितीची बैठक होणं महत्त्वाचं आहे. परंतु अद्यापही बैठक आयोजित करण्यात आलेली नाही. जर बैठकीचं आयोजन करण्यात येणार नसेल तर अशोक चव्हाण यांना उपसमितीच्या अध्यक्ष पदावरून हटवा अशी, मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाचे मुख्य समन्वयक रमेश केरे-पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. याबाबतच पत्र देखील केरे पाटील यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठवले आहे.

### व्हेन्च्युरा गॅरंटी लिमिटेड

**नोंद. कार्यालय :** 'आय-थींक टेक्नो कॅम्पस', बी-विंग, ८वा मजला, पोखरण रोड क्र. २, ऑफ ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे (पश्चिम), - ४०० ६०७.
**दूर.क्र.:** ०२२-६७५४७०००; **वेबसाईट:** www.venturaguaranty.com;
**ई-मेल:** investors.vgl@ventura1.com
**सीआयएन:** एल६५१००एमएच१९८४पीएलसी०३४१०६

**सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २९ प्रमाणे रेग्युलेशन्स ४७ सह वाचिता रेग्युलेशन्स २०१५च्या नियमानुसार ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या कालावधीकरिता कंपनीचे लेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मान्यता देण्याकरिता ठाणे येथे सोमवार, २९ जून, २०२० रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.
सदर माहिती कंपनीच्या www.venturaguaranty.com वेबसाईटवर आणि कंपनीचे शेअर्स येते सूचिबध्द आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या अर्थात www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

**व्हेन्च्युरा गॅरंटी लिमिटेडकरिता**
**सही/-**
**ठिकाण: ठाणे** **सुधा गणपती**
**दिनांक: २३ जून, २०२०** **कंपनी सचीव आणि अनुपालन अधिकारी**

### साश्वत टेक्नोक्रॅटस् लिमिटेड

**सीआयएन:**एल२४२२०एमएच१९७५पीएलसी०१८६८२
**नोंदणीकृत कार्यालय:** कार्यालय क्र. १४, १ला मजला, प्लबंर हाऊस, ५५७, जे.एस.एस. रोड, चिरा बाझार, मुंबई-४००००२. **दूर.:** २२०१६०२१/२२०१६०३१
**ई-मेल:** sashwat.technocrats@gmail.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचे एकमेव व एकत्रित लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता **सोमवार, २९ जून, २०२०** रोजी स.११.३०वा. कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे. पुढील तपशिलाकरिता कृपया www.bseindia.com ला भेट द्या.

**साश्वत टेक्नोक्रॅटस् लिमिटेडकरिता**
**सही/-, अक्षर जगदीश पटेल**
**दिनांक: २२.०६.२०२०** **कंपनी सचिव व सक्षम अधिकारी**
**ठिकाण: मुंबई**

### पिपल्स इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड

**(सीआयएन:**एल६७१२०एमएच१९७६पीएलसी०१८८३६)
**नोंद. कार्या.:** न्यू हिंद हाऊस, ३, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१, महाराष्ट्र.
**दूर.:**०२२-२२६८६०००, **फॅक्स:**०२२-२२६२००५२
**ईमेल:**peoplesinvestments@rediffmail.com
**वेबसाईट:**www.pplsinvestments.com

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ सहवाचिता नियम २९ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता कंपनीचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे, मान्यता देणे याकरिता **मंगळवार, ३० जून, २०२०** रोजी दु.३.००वा. कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.

सदर सूचना ही कंपनीच्या www.pplsinvestments.com वेबसाईटवर आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**पिपल्स इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडकरिता**
**सही/-**
**ठिकाण: मुंबई** **सुमा जी. नायर**
**दिनांक: २२.०६.२०२०** **संचालिका**

### नॅशनल प्लास्टिक इंडस्ट्रिज लिमिटेड

NATIONAL Since 1952

**नोंदणीकृत कार्यालय:** २१३, २१४ व २१५, २रा मजला, हब टाऊन सोलारिस, एन.एस. फडके मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९.
**सीआयएन:** एल२५२००एमएच१९८७पीएलसी०४४७०७
**दूरध्वनी क्र.**:९१-२२-६७६६९९९९; **फॅक्स क्र.**:९१-२२-६७६६९९९८
**ई-मेल:** info@nationalplastic.com; **वेबसाईट:** www.nationalplastic.com

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम २९ सहवाचिता नियम ४७ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे, मान्यता देणे व नोंद पटावर घेणे याकरिता कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय-२१३, २१४ व २१५, २रा मजला, हब टाऊन सोलारिस, एन.एस. फडके मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९ येथे **मंगळवार, ३० जून, २०२० रोजी** कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.

सदर सूचना कंपनीच्या www.nationalplastic.com वेबसाईटवर आणि स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

**नॅशनल प्लास्टिक इंडस्ट्रिज लिमिटेडकरिता**
**सही/-**
**ठिकाण: मुंबई** **मयुरी जोशी**
**दिनांक: २२.०६.२०२०** **कंपनी सचिव व सक्षम अधिकारी**

### एलसिड इन्व्हेस्टमेंटस् लिमिटेड

ELCID INVESTMENT LIMITED

**सीआयएन: एल६५९९०एमएच१९८१पीएलसी०२५७७०**
**नोंदणीकृत कार्यालय :** ४१४, शाह नाहर (वरळी) इंडस्ट्रीयल इस्टेट, बी विंग, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८.
**दूर.क्र.:**६६६२५६०२, ६६६२५६०४, **फॅक्स:**०२२-६६६२५६०,
**ई-मेल:**vakilgroup@gmail.com, **वेबसाईट:**www.elcidinvestments.com

**सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या चतुर्थ तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व नोंदपटावर घेणे याकरिता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **मंगळवार, ३० जून, २०२०** रोजी **एलसिड इन्व्हेस्टमेंटस् लिमिटेड**च्या संचालक मंडळाची सभा होणार आहे. संपुर्ण तपशिल स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com व कंपनीच्या www.elcidinvestments.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मंडळाच्या आदेशान्वये
**एलसिड इन्व्हेस्टमेंटस् लिमिटेडकरिता**
**सही/-**
**वरुण वकिल**
**ठिकाण : मुंबई** **अध्यक्ष**
**दिनांक : २२.०६.२०२०** **डीआयएन:०१८८०७५९**

### जाहीर सूचना

येथे सर्व सामान्य जनतेस सूचना देण्यात येत आहे की, श्री. शंभुलाल केशवजी तन्ना हे निवासी जागा फ्लॅट क्र.२१, २रा मजला, बी विंग, गित-सरिता को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. (नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/२८९३/१९७१ दिनांक १६.०४.१९७१) (सदर सोसायटी म्हणून उल्लेख), डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई-४०००८० (यापुढे सदर जागा म्हणून उल्लेख) तसेच भागप्रमाणपत्र क्र.२२ मध्ये नमुद अनुक्रमांक १११ ते ११५ (दोन्ही समाविष्ट) धारक सदर सोसायटीचे रु.५०/- प्रत्येकीचे ५ पुर्णपणे भरणा केलेले शेअर्स (यापुढे सदर शेअर्स म्हणून उल्लेख) शेअर्सचे पुर्णत: मालक होते. उपरोक्त सदर जागेसंदर्भातील दस्तावेजांची मालिका करारनामा दिनांक २४ जून, १९८१ जे श्री. कवुनकल मादोम त्यागराजन रामन आणि श्री. शंभुलाल केशवजी तन्ना यांच्या दरम्यान निष्पादित झाले होते. सदर श्री. शंभुलाल केशवजी तन्ना यांचे २० मे, २००० रोजी निधन झाले, त्यांचे पश्चात (१) श्रीमती रुक्मिणीबेन शंभुलाल तन्ना (विधवा पत्नी), (२) श्रीमती हेमलता अरविंद जोबनपुत्रा (विवाहापुर्वीचे नाव हेमलता शंभुलाल तन्ना) (विवाहीत मुलगी), (३) श्रीमती फाल्गुनी जगदीशभाई सोमय्या (विवाहापुर्वीचे नाव फाल्गुनी शंभुलाल तन्ना) (विवाहीत मुलगी), (४) श्रीमती उर्मिला केतन मेहता (विवाहापुर्वीचे नाव उर्मिला शंभुलाल तन्ना) (विवाहीत मुलगी), (५) श्री. कमलेश शंभुलाल तन्ना (मुलगा) अर्थात माझे अशील हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. सदर श्री. शंभुलाल केशवजी तन्ना यांनी त्यांच्या आयुष्यात त्यांची पत्नी श्रीमती रुक्मिणीबेन शंभुलाल तन्ना यांना वारसदार म्हणून नामांकित केले होते आणि सदर जागा व सदर शेअर्ससंदर्भात सदस्यत्व अधिकार हस्तांतरणाकरिता सदर सोसायटीने कायद्याच्या प्रक्रियेचे पालन करून त्यांची वारसदार अर्थात श्रीमती रुक्मिणीबेन शंभुलाल तन्ना यांच्या नावे केले आहेत. सदर जागाबाबतचे दिनांक २४ जून, १९८१ रोजीचे करारनामापुर्वी निष्पादित सर्व मुळ दस्तावेज हरवले/गहाळ झाले आहेत आणि अत्यंत शोध घेतल्यानंतरही ते सापडलेले नाहीत. माझे अशिलांकडे त्यांच्या नोंदीत दिनांक २४ जून, १९८१ रोजीचे सदर करारनामापुर्वी निष्पादित दस्तावेजांची कोणतीही छाया प्रत उपलब्ध नाही. जर कोणा व्यक्तीस/बँकेस/वित्तीय संस्थेकडे सदर जागेसंदर्भातील दिनांक २४ जून, १९८१ रोजीचे सदर करारनामापुर्वी निष्पादित सदर मुळ दस्तावेजांचा ताबा असल्यास किंवा कोणाही व्यक्तीस विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, कायदेशीर हक्क, वहिवाट, करारनामा, तारण, वारसाहक्क, मृत्युपत्र, ताबा करारनामा, बक्षीस, मालकीहक्क, अधिकार, परिरक्षा, न्यास, मुळ अधिकार करारनामांचा ताबा किंवा अन्य इतर प्रकारे कोणतेही स्वरुपाचे विकास अधिकार, तारण/करारनामा/कंत्राट, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, पारिवारीक तजवीज/व्यवस्था स्वरुपात कोणताही अधिकार, हक्क, हित, दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा असे समजले जाईल की, सदर जागेबाबत कोणताही दावा किंवा मागणी नाही आणि अशा व्यक्तींचे दावा व मागणी त्याग व स्थगित केले आहेत असे समजले जाईल आणि सदर जागेचे अधिकार हे स्पष्ट बाजारभाव योग्य व सर्व अधिभारापासून मुक्त असल्याचे जाहीर केले जाईल.

**मुंबई, आज दिनांकीत २३ जून, २०२०**
**सही/-**
**विकास ठक्कर**
**वकील उच्च न्यायालय**
दुकान क्र.२, अंबे धाम प्रिमायसेस को-ऑप. सो.लि., अंबाजी धाम मंदिराजवळ, एम.जी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८०.

### PUBLIC NOTICE

Shri Nandlal G. Makhija a Member of The Dohad Saifee CHS ltd. (Windswept) Regd. No. (BOM. /HSG. /5359) Situated at Plot No.10/6, North South Road No. 9, Near Vidyanidhi School, JVPD Scheme, Vile-Parle (w), Mumbai-400049. Holding Original Share Certificate (5 Shares) Certificate No.37 Distinctive Nos. From 0166-0170 of Rupees 50.00 Each and Flat No. 501-A wing of the society, expired on 02.10.2019 without making any nomination.
The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/ property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society. If no claims/ objections are received within the mentioned period, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital / property of the society in such a manner as is provided under the bye laws of the society. The claims/ objections, if any received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye laws of the society. A copy of Regd. bye laws of the society is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society/with the secretary of the society between 7.00 PM to 9.00 PM from the date of publication of this notice till the expiry of its period.
Place: MUMBAI
Date: 23/6/2020

**For and on behalf of**
**The Dohad Saifee CHS Ltd.**
**(Windswept)**
Sd/-
Hon. Secretary

### Trio Mercantile and Trading Ltd

**Regd. Office:** 613/B, Mangal Aaarambh, Near MC Donalds, Kora Kendra Road,
CIN: L51909MH2002PLC136975

**NOTICE**

Notice is hereby given that a Meeting of Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, 30th June , 2020 inter alia to consider and to take on record the audited financial results of the Company for the quarter ended on 31st March, 2020.
Further the Company confirms that as per the Company's internal code for prevention of Insider Trading, the trading window for dealing in the securities of the Company is closed for the Company's Directors /officers and designated employees of the Company from 1st day of April, 2020 till 1st day of July, 2020.

For **Trio Mercantile and Trading Ltd**
Sd/-
Megha Trivedi
Place : Mumbai Company Secretary
Date : 22nd June, 2020

### मन इन्फ्राकन्स्ट्रक्शन लिमिटेड

MAN

**नोंदणीकृत कार्यालय:** १२वा मजला, कृशल कमर्शिअल कॉम्प्लेक्स, जी.एम.रोड, चेंबुर (प.), मुंबई-४०००८९.
**दुरध्वनी:**+९१-२२-४२४६३९९९, **फॅक्स:**+९१-२२-२५२५१५८९,
**सीआयएन:** एल७०२००एमएच२००२पीएलसी१३६८४९
**वेबसाईट:**www.maninfra.com, **ई-मेल:**office@maninfra.com

**सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्कोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम २९ सहवाचिता नियम ४७ नुसार ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व वित्तीय वर्षाकरिता कंपनीचे एकमेव व एकत्रित लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे, मान्यता देणे व नोंदपटावर घेणे याकरिता **सोमवार, २९ जून, २०२०** रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.
सदर माहिती कंपनीच्या www.maninfra.com वेबसाईटवर आणि कंपनीचे शेअर्स सुचिबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजेस, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com व बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**मन इन्फ्राकन्स्ट्रक्शन लिमिटेडकरिता**
**सही/-**
**ठिकाण: मुंबई** **दुर्गेश डिंगणकर**
**दिनांक: २२.०६.२०२०** **कंपनी सचिव व सक्षम अधिकारी**

### SIGNET INDUSTRIES LIMITED

The Irrigation House

**CIN: L51900MH1985PLC035202**
**Regd. Office: 1003, Meadows Building, Sahar Plaza Complex, Andheri Kurla Road, Andheri (East), Mumbai – 400059**
Website: www.groupsignet.com, E-mail: cspreeti@groupsignet.com, Phone no.: 0731-4217800

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 of SEBI (Listing obligations & Disclosure Requirements) Regulation, 2015, Notice is hereby given that the Meeting of the Board of Directors (BM/02/2020-21) of the company will be held on Tuesday June 30, 2020 at 4:00 PM at the Corporate office of the company at 314/3, SDA Compound, Lasudia Mori, Dewas Naka, Indore – 452 010, To consider and Approve the audited financial results of the Company for the Quarter and year ended on 31st March, 2020 and to recommend dividend ,if any, on equity shares of the Company for the financial year ended on 31st March, 2020;
In view of the clarification issued by the BSE Limited on 2nd April, 2019 regarding the commencement of trading restriction period not later than end of every quarter till 48 hours after the declaration of financial results, the Trading Window has been closed from 1 st April, 2020 to 2nd July, 2020 (both days inclusive).

**For SIGNET INDUSTRIES LTD**
**Sd/- Mukesh Sangla**
Managing Director
**Place: Indore** **DIN 00189676**
**Date: 20th June, 2020**

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM RUTVI VILESH PATEL TO RUTVI VILESHKUMAR PATEL AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM VARSHABEN VILESHKUMAR PATEL TO VARSHA VILESHKUMAR PATEL AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM VILESH PATEL TO VILESHKUMAR AMICHAND PATEL AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM SARIKA PURSHOTTAM PITRODA TO SARIKA PARSHOTAM PITRODA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM ANILKUMAR MEGHRAJ JAIN TO ANIL MEGHRAJ JAIN AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM AKSHA ZAKIR HUSSEIN GOGADA TO AKSHA ZAKIR HUSSAIN GOGDA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM ZAKIR HUSSEIN GOGDA TO ZAKIR HUSSAIN GOGDA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAMIM ZAKIR HUSSEIN GOGDA TO SHAMIM ZAKIR HUSSAIN GOGDA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM URVI HARESH PAREKH TO OORVI PAREKH AS PER MAHARASHTRA GAZETTE NO. (M-204212)

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMED ZAFER JAMALUDDIN TO MOHAMMED ZAFAR JAMALUDDIN SHAIKH AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM RAEES AHMED TO RAEES AHMED ANSARI AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM ZAINABEE TO JHENNABI CHAND KHAN AS PER DOCUMENTS.

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM SAJIDA ZAFER MOHAMED TO SAJIDA ZAFAR SHAIKH AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM TINA SURESH ROHRA TO UPASNA SURAJ SHARMA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM ASHISH SURESHKUMAR MADHU TO ASHISH SURESH MADHU AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM BHAGYESH SURESH MADHU TO BHAGYESH SURESHKUMAR MADHU AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM TO JAYESH KUMAR MANUBHAI SHAH TO JAYESH MANUBHAI SHAH AS PER MAHARASHTRA GAZETTE NO. (M-204826)

I HAVE CHANGED MY NAME FROM NALINI GOVIND KOULKAR TO NALINI GOVIND KAULKAR AS PER MAHARASHTRA GAZETTE NO (M-202194)

WE HAVE CHANGED OUR MINOR DAUGHTER'S NAME FROM JAINAB KHURSHID AHMED SHAIKH TO ZAINAB KHURSHID AHMED IDRISI AS PER MAHARASHTRA GAZETTE NO (M-201201)

I HAVE CHANGED MY NAME FROM KHURSHID AHMED SHAKEEL AHMED SHAIKH TO KHURSHID AHMED SHAKIL AHMED IDRISI AS PER MAHARASHTRA GAZETTE NO (M-201313)

I HAVE CHANGED MY NAME FROM FATIMA KEJAR HUSSAIN TO FATEMA HUSSAIN JAORAWALA AS PER MY DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM YASH KUMAR MISHRA TO YASH RAMA MISHRA. AS PER DECLARATION